# महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन

संलग्न : भारतीय हौशी कबड्डी महासंघ व महाराष्ट्र ऑलिम्पीक असोसिएशन

नोंदणी क्र. : एफ ६२६ (मुंबई) व मुंबई २१/१९५६ जी.बी.बी.एस.डी.

कार्यालय : शिवा ी पार्क मैदान, वीर सावरकर मार्ग, दादर, मुं ई - ४०० ०२८ संपर्क - २४४४८४९४ फॅक्स - २४४४२३३०

Email : maharashtra.kabaddi@gmail.com Web : www.maharashtrakabaddi.com



आजीव अध्यक्ष
श्री.शरद पवार

अध्यक्ष
श्री.अजित पवार

कार्याध्यक्ष
श्री.गजानन कीर्तिकर

उपाध्यक्ष
श्री.सुनिल तटकरे
श्री.अशोक (भाई) जगताप
श्री.अमरसिंह पंडीत
श्री.दिनकर पाटील
श्री.शशिकांत गाडे
श्रीमती शकुंतला खटावकर
श्रीमती नेत्रा राजेशिर्के

सरकार्यवाह
ॲड.श्री.आस्वाद पाटील

खजिनदार
श्री.मंगल पांडे

सहकार्यवाह
श्री.रविंद्र देसाई
श्री.मोहन गायकवाड
श्री.मदन गायकवाड
श्री.महादेव साठे
श्री.मनोज पाटील
श्रीमती सय्यदा पटेल
श्रीमती स्मिता जाधव

समिती सदस्य
श्री.देवराम भोईर
श्री.बाबुराव चांदेरे
श्री.नितीन बरडे
श्री.मुजफ्फर अली सय्यद
श्रीमती लिना कांबळे


संदर्भ क्र.: एम.एस.के.ए./ दिनांक : २८/०७/२०२२

## राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा मान्यतेसाठी अटी व नियमपत्रक

१. राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेची मान्यता घेताना स्पर्धा आयोजन करणाऱ्या संस्थेला स्पर्धा नियोजन वर्गणी (स्वामीत्वधन), खेळाडू निधी व स्पर्धा मान्यता वर्गणी त्याचप्रमाणे जिल्हा असोसिएशनची मान्यता वर्गणी भरून सोबत जोडलेल्या अर्जावरील संपूर्ण माहिती भरून देणे आवश्यक आहे. अर्जावर कार्यवाह सही व जिल्हा असोसिएशनचा शिक्का असणे जरूरीचे आहे.

२. किशोर/किशोरी गट, कुमार/कुमारी गट, पुरूष/महिला वरीष्ट गट, व्यावसायिक पुरूष/व्यावसायिक महिला व व्यावसायिक पुरूष/स्थानिक महिला यापैकी एकाच वेळी एकाच गटाला स्पर्धा मान्यता देण्यात येईल. दोन गटाची एकत्र मान्यता घ्यावयाची असल्यास स्पर्धा नियोजन वर्गणी (स्वामीत्वधन) अधिक आकारण्यात येईल.

३. स्पर्धा मान्यता कमीत कमी स्पर्धेच्या १० दिवस अगोदर घेणे अनिवार्य राहील.

४. स्पर्धा भारतीय कबड्डी महासंघाच्या प्रचलीत नियमानुसार साखळी व बाद पध्दतीने खेळविल्या जातील.

५. स्पर्धेत सहभागी होणारे संघ व संघातील खेळाडूंची राज्य असोसिएशनच्या नियमानुसार ऑनलाईन खेळाडू नोंदणी असणे आवश्यक आहे. ऑनलाईन नोंदणीकृत प्रवेशअर्जच स्विकारणयात येतील. ऑनलाईन खेळाडू नोंदणी केलेल्या संघांची यादी (स्थानिक/व्यावसायिक) राज्य असोसिएशनकडे मागणी केल्यास, आपणांस पुरविण्यात येईल.

६. स्पर्धेसाठी उत्कृष्ट दर्जाची मातीची क्रीडांगणे बनवावीत अथवा मॅटची क्रीडांगणे असल्यास योग्य प्रकारे क्रीडांगणे असावीत. मॅटच्या क्रीडांगणावर स्पर्धा असल्यास मॅटच्या शुजची पुर्वकल्पना संघास देणे आवश्यक असून मॅटच्या क्रीडांगणावर शुजविना खेळता येणार नाही. ध्वनीक्षेपकासह योग्य विद्युत पुरवठा असावा. प्रत्येक क्रीडांगणावर विद्युत गुणफलक व ३० सेकंद आणि ३ री चढाई दर्शविणारी यंत्रणा असावी.

७. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या संघांना रेल्वे सवलत मिळत असल्यास रेल्वे सवलतीप्रमाणे तसेच रेल्वे सवलत मिळत नसल्यास दुसऱ्या वर्गाचे १२ खेळाडू, प्रशिक्षक व व्यवस्थापक याप्रमाणे १४ जणांचे प्रवास भाडे आरक्षण शुल्कासहित संयोजकांना द्यावे लागेल. परंतु जेथे रेल्वे प्रवास उपलब्ध नसेल अशा ठिकाणच्या संघास एस. टी. बसचे दोन्ही बाजूचे प्रवास भाडे रोख द्यावे लागेल.

८. स्पर्धेत सहभागी होणारे निरिक्षक, पंचप्रमुख, सहाय्यक पंचप्रमुख, पंच, प्रशिक्षक, व्यवस्थापक व खेळाडूंची निवास व भोजन व्यवस्था संयोजकांना विनामुल्य करावी लागेल. जर भोजन व्यवस्था नसल्यास प्रतिदिन प्रत्येकी रू. ३००/– प्रमाणे भोजन भत्ता द्यावा लागेल.

९. स्पर्धेत देण्यात येणारी रोख पारितोषिके व चषक यांचा स्पष्ट उल्लेख प्रवेशअर्जा सोबत देण्यात येणाऱ्या परिपत्रकावर करणे आवश्यक आहे. दैनंदिन पारितोषिके व स्पर्धेतील रोख पारितोषिकांची रक्कम धनादेश न देता रोख स्वरूपातच देण्यात यावी. तृतिय क्रमांकाचा सामना न खेळविता उपांत्य फेरीतील दोन्ही उपविजेत्या संघांना समान पारितोषिके रोख रक्कमेच्या स्वरूपात द्यावीत व कायमस्वरूपी चषक देण्यात यावा. पुरूष आणि महिला संघांना समान पारितोषिके देण्यात यावी त्यात तफावत असता कामा नये.

१०.राज्यस्तरीय स्पर्धेस राज्य संघटनेने नियुक्त केलेल्या निरीक्षक व पंचप्रमुख यांना दैनंदिन भत्ता रू. ८००/– व नैमितिक भत्ता रू. ८००/– प्रमाणे (संपूर्ण स्पर्धेकरीता) आणि प्रथम वर्गाचे रेल्वे किंवा खाजगी बस भाडे द्यावे लागेल तसेच नियुक्त केलेल्या सहाय्यक पंचप्रमुख व पंचाना दैनंदिन भत्ता रू. ६००/– व नैमितिक भत्ता रू. ६००/–(संपूर्ण स्पर्धेकरीता) प्रमाणे. त्याशिवाय निरीक्षक, पंचप्रमुख व पंच यांचा प्रवास २०० किलो मीटरपेक्षा जास्त असेल तर अधिक एक दिवसाचा दैनंदिन भत्ता द्यावा लागेल. रेल्वे किंवा बसचे येण्या–जाण्याचे प्रवास भाडे (आरक्षणासह) द्यावे लागेल. याव्यतिरिक्त स्पर्धा सकाळ व संध्याकाळ दोन सत्रात झाल्यास निरीक्षक व पंचप्रमुख यांस त्या सत्राचे अधिक रू. ४००/– आणि सहाय्यक पंचप्रमुख व पंच यांना अधिक रू. ३००/– द्यावे लागतील.

११. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी येणारे निरीक्षक, पंचप्रमुख, सहाय्यक पंचप्रमुख, पंच व पदाधिकारी यांच्यासाठी स्पर्धा संपल्यावर परतीच्या प्रवासाच्यावेळी स्टेशन व एस.टी.स्टँड येथून त्यांना आणण्यासाठी व परत पोहोचविण्यासाठी बस अथवा इतर वाहनांची सोय असावी. अगर व्यवस्था नसल्यास एस.टी. बसचे अथवा रिक्शाचे भाडे देण्यात यावे.

राज्य कबड्डी असोसिएशन
दादर
मुंबई
४०००२८